## धर्मप्रांतीय उपासना आयोग, वसई

## पुनरूत्थान दुसरा रविवार – दैवी दयेचा रविवार

## ०७ एप्रिल २०२४

## श्रद्धावंताच्या प्रार्थना

धर्मगुरू ः माझ्या बंधू भगिनींनो, ख्रिस्ताच्या पुनरूत्थानाच्या आनंदासह आपण आपल्या परमेश्वर पित्याकडे प्रार्थना करू या. त्याच्या अतिप्रिय पुत्राच्या प्रार्थना त्याने ऐकल्या आणि स्वीकारल्या तो आपल्या मागण्या पूर्ण करील असा विश्वास बाळगू या.

प्रतिसाद ः प्रभो, आमची प्रार्थना ऐक.

१. आपले पोप फ्रान्सिस, आर्चबिशप फेलिक्स, धर्मगुरू व व्रतस्थ ह्यांना दैवी दयेच्या सामर्थ्याने पुनरूस्थित ख्रिस्ताची साक्ष जगाला देण्यासाठी धैर्य लाभावे म्हणून आपण प्रार्थना करू या.

२. आपले राज्यकर्ते व अधिकारी ह्यांना देशाचा कारभार निःस्वार्थीपणे पाहण्यास व जनतेच्या हितासाठी कार्य करण्यास दैवी दयेचे साहाय्य लाभावे म्हणून आपण प्रार्थना करू या.

३. येशूला स्पर्श न करता संत थॉमस ह्यांनी "माझ्या देवा माझ्या प्रभो" या शब्दाद्वारे पुनरूत्थित ख्रिस्तावर विश्वास प्रकट केला. पाहिल्या वाचून विश्वास ठेवणारे ते धन्य असे म्हणणा-या प्रभू येशू ख्रिस्तावर आपली श्रद्धा अधिक दृढ व्हावी म्हणून आपण प्रार्थना करू या.

४. पुनरूत्थित ख्रिस्ताच्या प्रकाशाने आपल्या प्रत्येकाचे जीवन उजळावे, आपल्या कुटुंबात व गावपरिवारात नेहमी शांततेचे वातावरण असावे म्हणून आपण प्रार्थना करू या.

५. प्रभूच्या सामर्थ्यशाली कृपेचा स्पर्श गरीब, आजारी, निराश्रित व निराधार लोकांना घडावा, सर्व प्रकारच्या नैसर्गिक आपत्ती पासून आपले रक्षण व्हावे तसेच आपल्या देशातील निवडणूक शांतपणे पार पडावी म्हणून आपण प्रार्थना करू या.

थोडा वेळ शांत राहून आपण आपल्या वैयक्तिक गरजांसाठी प्रार्थना करू या.

धर्मगुरू ः हे स्वर्गीय पित्या तुझ्या लोकांच्या जीवनातील अनेक गरजांची तुला जाणीव आहे. तुझ्यावर विश्वास ठेवणा-या सर्वांच्या प्रार्थना ऐक आणि त्यांचा स्वीकार कर. ही प्रार्थना आमच्या प्रभूख्रिस्ताद्वारे करतो. आमेन.